वर्ष-०८ अंक-१६ मुंबई, मंगळवार ०८ ते १४ मार्च - २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 अखेर अकोल्यातील 'त्या' दोन बेपत्ता अल्पवयीन मुलींचा शोध लागला!

3 → सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पिंपळनेर शाखेत मोठा अपहार, बँकेतील चौघांवर गुन्हा दाखल

नालासोपाऱ्यात तीन वर्षांच्या चिमुरड्यासह पित्याचा लोकलखाली आत्महत्येचा प्रयत्न ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मुंबईकरांसाठी मोठी बातमी

## आठवडाभर 'नो टोइंग'



मुंबईः संपर्कात राहू या, असे आवाहन करत आपल्या मोबाइल क्रमांक नागरिकांना देणाऱ्या पोलिस आयुक्त संजय पांडे यांनी मुंबईकरांना भेट दिली आहे. तुमच्यासाठी आठवडाभर नो पार्किंगमधील वाहनांचे टोईंग केले जाणार नाही. जर नियमांचे पालन केले, तर हा निर्णय कायम केला जाईल, असे पांडे यांनी ट्विटच्या माध्यमातून जाहीर केले आहे. असे असले तरी त्याचा अर्थ गाड्या कुठेही उभ्या करा, असा होत नाही. अनधिकृत जागेवर गाड्या उभ्या केल्यास ई-चलानद्वारे दंड आकारला जाणार आहे. रस्त्याच्या कडेला, नो पार्किंगमध्ये उभी केलेली वाहने वाहतूक पोलिसांकडून उचलन चौकीमध्ये नेली जातात.टोईंग करताना वाहनांवर वाहने घासली जातात, वाहतूक पोलिस चौकीमध्ये जाऊन वाहने परत आणण्यात वेळ वाया जातो. त्यामुळे यापुढे आठवडाभर टोईंगमधून वाहनचालकांची सुटका झाली आहे. पांडे यांनी यासंदर्भात ट्वीट केले आहे. 'प्रिय मुंबईकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने मी भारावून गेलो आहे. सर्वात आधी आम्ही वाहने उचलून नेणे थांबवित आहोत. आपण सर्वांनी जर नियमांचे पालन केले तर प्रायोगिक तत्त्वावरील हा प्रयोग नियमित करण्यात येईल. तुम्हाला काय वाटत ते मला नक्की सांगा', असे पांडे यांनी ट्वीटमध्ये नमूद केले आहे.

पोलिस आयुक्तांच्या ट्वीटला पोलिसांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.

# अमरावती पोलिसांची मोठी कारवाई! धाडीत 10 किलो सोने सापडले, रोख रक्कमही जप्त

अमरावती : राजापेठ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अमरावती शहरातील दसरा मैदान परिसरातील राधाकृष्ण अपार्टमेंट आहे. या अपार्टमेंटच्या फ्लॅट क्रमांक 401 मध्य काही व्यक्ती संशयास्पद असल्याची गुप्त माहिती मध्यरात्रीच पोलिसांना मिळाली. त्याआधारे राजापेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनीष ठाकरे व त्यांचे पथक व्हिडीओ कॅमेरा घेऊन या अपार्टमेंटमध्ये दाखल झाले. यावेळी त्या फ्लॅटमध्ये राजेंद्र सिंगसह अन्य दोन व्यक्ती राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या व्यक्तींकडे बरेच व्यवहाराचे कागदपत्र देखील होते. असंही पोलीस निरीक्षक ठाकरे यांनी सांगितलं. हे आरोपी सोने व्यापाऱ्यांच्या संपर्कात अशी माहिती समोर आली आहे.




### सोन्याची किंमती सुमारे पाच कोटी

या कारवाई दरम्यान दहा किलोपेक्षा जास्त सोन्याचे दागिने सापडले. याची सोन्याची किंमत पाच कोटी इतकी आहे. शिवाय पाच लाख रुपये रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली. या प्रकरणाची संपूर्ण माहिती पोलिसांनी आयटी विभागालाही दिली आहे, असं पोलिसांनी सांगितलं. या प्रकरणातील मूळच्या राजस्थानातील राजेंद्र सिंग या आरोपीला अटक करण्यात आली आहे. तसेच त्याला न्यायालयातदेखील दाखल करण्यात येणार असल्याचं पोलीस निरीक्षक मनीष ठाकरे यांनी सांगितलं.

### व्यवसाय चार वर्षांपासून

धाड पडली त्याठिकाणी राजेंद्र सिंग राव व्यवसाय करतो. गिरीराज जगदीश सोनी व अशोक सत्यनारायण खंडेलवाल हे त्याचे साथीदारही आता पोलिसांच्या ताब्यात आहेत. तो चार वर्षांपासून हे काम करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. कच्च्या चिठ्ठ्या-पट्ट्यांवरून काहीतरी गडबड दिसते. विशेष म्हणजे रात्री अडीच वाजता राजपेठ पोलिसांनी ही धाड टाकली. टीममध्ये पीआय अहीरकर, पीएसआय मापारी, महिला व इतर कर्मचारी असा सारा ताफा घेऊनही पोलीस पोहचले होते. त्यामुळं आरोपींना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. आयटी डिपार्टमेंटला या घटनेची माहिती देण्यात आली आहे. पुढील तपास ते करतील. त्यानंतर हे सोने कुठून आले आणि कुठे घेऊन जात होते. याचे मुख्य सूत्रधार कोण आहेत, याचा खुलासा होण्याची शक्यता आहे.

## ७० वर्षीय वृद्धाला दोघांनी केली लोखंडी रॉडने मारहाण




रत्नागिरी: ट्रक पार्क करण्यावरून वाद झाल्यानंतर ७० वर्षीय वृद्धाला दोघांनी लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरीत धामणी ब्राह्मणवाडी येथे ही घटना घडली. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला




## डोक्यात उखळ घातलं, पत्नीच्या छातीत चाकूने वार केले

औरंगाबाद : मद्यपी पतीच्या सततच्या त्रासाला कंटाळून पत्नी माहेरी निघाली असतानाच, पतीने चक्क माहेरी निघालेल्या पत्नीच्या छातीत चाकू खुपसल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अश्विनी दीपक भांबळे (२४, रा. पिसादेवी) असे जखमी विवाहितेचे नाव आहे. तर या घटनेनंतर त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु होते.

पतीच्या हल्ल्यात जखमी झालेल्या अश्विनी ३ मार्च रोजी शुद्धीवर आल्याने त्यांनी पोलिसांना जबाब दिला आहे. त्यावरुन पती दीपक भांबळे विरुद्ध चिकलठाणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर आपल्या जबाबात अश्विनी यांनी म्हटलं आहे की, तर २७ फेब्रुवारीला दीपकने मोबाईलवरुन अश्विनीशी वाद घातला. स्वयंपाक घरातून उखळीने डोक्यात वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अश्विनी यांनी स्वत:चा बचाव केला. तेव्हा मी तुला जिवंत सोडणार नाही, असं म्हणत तो स्वयंपाक खोलीत गेला.




तेवढ्यात त्याचा राग पाहून अश्विनी तात्काळ मुलीला घेऊन घराबाहेर पडल्या. इमारतीखालील एका दुकानासमोरुन अश्विनी यांनी घडलेला प्रकार माहेरच्या मंडळींना सांगितला. त्यानंतर जवळच राहणाऱ्या मामाला घेऊन येत त्यांनी पिशवीत कपडे भरायला सुरूवात केली. तेवढ्यात स्वयंपाक खोलीतून बाहेर आलेल्या दीपकने अश्विनीच्या डोक्यात उखळ घालून नेत छातीत चाकू खुपसला, ज्यात आश्विनी गंभीर जखमी झाल्या होत्या.

अश्विनी यांचा २०१६ मध्ये दीपकसोबत विवाह झाला. त्यांना तीन वर्षांची एक मुलगी आहे. भांबळे दाम्पत्य पिसादेवी परिसरात राहते.

## अभ्यासासाठी खोलीत गेली, बराच वेळ बाहेर आली नाही; बघितल्यानंतर धक्काच बसला

रत्नागिरी: रत्नागिरी शहराजवळील कारवांचीवाडी येथे धक्कादायक घटना घडली. एका तरूणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिची बारावीची परीक्षा सुरू आहे. अभ्यास करण्यासाठी जाते असे सांगून ती खोलीत गेली, मात्र बराच वेळ झाला तरी बाहेर आली नाही. घरच्यांनी खोलीत जाऊन बघितल्यानंतर त्यांना धक्काच बसला. तिचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. तिने हे टोकाचे पाऊल का उचलले, यामागचे कारण समजू शकलेले नाही.



कारवांचीवाडी येथे ही घटना घडली. तरुणीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. तिची बारावी इयत्तेची परीक्षा सुरू होती. परीक्षेचा अभ्यास करायला खोलीत जाते, असे सांगून ती निघून गेली. मात्र, बराच वेळ ती बाहेर आली नाही. कुटुंबीयांनी खोलीत जाऊन बघितल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघड झाला. शनिवारी, ५ मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. वैष्णवी (वय २१, कारवांचीवाडी, रत्नागिरी) असे या तरुणीचे नाव आहे. याबाबत ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वैष्णवी ही बारावी इयत्तेत होती. तिची परीक्षा सुरू आहे.

## खोपोलीत केमिकल कंपनीला भीषण आग; 4-5 किलोमीटरवर धुराचे लोट

खोपोली: रायगड जिल्ह्यातील खोपोलीत केमिकल कंपनीला भीषण आग लागली. आग इतकी भीषण होती की, चार ते पाच किलोमीटर परिसरात धुराचे लोट दिसत होते. त्यामुळे परिसरात घबराट पसरली होती. या आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. या आगीत दोन कामगार गंभीर जखमी झाल्याची माहिती समजते. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील खोपोली येथील अल्टा फार्मास्युटिकल लॅब या कंपनीत भीषण आग लागली. या घटनेची माहिती अग्निशमन दलाला मिळाल्यानंतर, तातडीने यंत्रणा घटनास्थळी पोहोचली. कंपनीला लागलेली आग इतकी भीषण



होती की, चार ते पाच किलोमीटर परिसरात धुराचे लोट दिसत होते. त्यामुळे परिसरात प्रचंड भीती निर्माण झाली होती. आगीत कंपनीतील संपूर्ण प्लांट जळून खाक झाला. आठ रिॲक्टर पूर्णपणे भक्ष्यस्थानी पडले, अशी माहिती समजते.खोपोली नगरपालिका, अलाना कंपनीच्या अग्निशमन यंत्रणांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, धुराचे लोट हे पाच किलोमीटरपर्यंत पसरले होते. आग नियंत्रणात आली असली तरी, धोका अद्याप टळलेला नाही असे सांगण्यात येत आहे. या आगीत दोन कामगार गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळते.

## पोलिसांचे फटके पडताच तळीरामांची उतरली



लातूर : उघड्यावर मद्य प्राशन करून आरडाओरडा करणाऱ्या तळीरामांना पोलिसांनी टोले देत त्यांना चांगलाच दणका दिला. अशा तब्बल 40 जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करत लातूर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आलेत.शहरात अनेक ठिकाणी उघड्यावर, रस्त्यावर मद्य प्राशन करण्याचं प्रमाण वाढलं आहे. मद्य प्राशन केल्यानंतर हे तळीराम रस्त्यावर आरडाओरडा करत अश्लील शिवीगाळ करतात. तसेच अनेकजण मद्य प्राशन करून खासगी शिकवणी असणाऱ्या भागात विनाकारण आरडाओरडा करत फिरताना दिसून येत होते. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. यासंदर्भात पोलिसांना अनेकांनी तक्रारी केल्या. हीच पार्श्वभूमी लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या आदेशावरुन परिविक्षाधीन पोलिस अधीक्षक अभयसिंह देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मोहीम आखण्यात आली आणि शहरातील विविध ठिकाणांहून तळीरामांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

# भंडाऱ्यातील नाकाबंदीत दोघांना तलवारींसह अटक

भंडारा : चारचाकी वाहनात तलवारी (Sword in a four wheeler) घेऊन फिरत असलेल्या इसमांना भंडारा पोलिसांनी (Bhandara Police) रात्री नाकाबंदी दरम्यान अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव सत्यजित मनोहर गजभिये व मनोज हिराचंद मेश्राम सांगितले जात आहे. दोघे रामटेक येथील रहिवासी आहेत. तलवारी वेळीच सापडल्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. रात्री दरम्यान भंडारा येथील शास्त्री चौकात पोलिसांनी नाकाबंदी केली होती.



या वेळेस वरठीकडून बीट्स चारचाकी क्रमांक MH 14 BX 9034 ही संशयास्पद येताना आढळली. नाकाबंदी करीत असलेल्या पोलिसांनी गाडी अडवून विचारपूस केली. गाडीत असलेले दोघे घाबरत असल्याचे लक्ष्यात आले. तलवारी घेऊन रात्री फिरस्ती गाडीची झडती घेण्यात आली. मागील सीटखाली एक मोठी व एक लहान अश्या दोन तलवारी आढळल्या. पोलिसांनी सत्यजित मनोहर गजभिये व मनोज हिराचंद मेश्राम यांना अटक केली. गाडी व तलवारी जप्त केल्या आहेत. पोलिसांनी संशय व्यक्त केला आहे की, दोघे एखादा मोठा गुन्हा करायला जात असावेत, अशी माहिती पोलीस निरीक्षक सुभाष बारसे यांनी दिली. आता पोलीस आरोपींचा कसून तपास करत आहेत. ते नेमके तलावारी घेऊन कुठे जात होते, हे शोधणे गरजेचे आहे. या तलवारींचा दुरुपयोग कसा केला जाणार होता, याची शहानिशा केली जात आहे.

वर्धा येथील अपघातात एकाचा मृत्यू

दुसऱ्या घटनेत, वर्धा जिल्ह्याच्या सेलू तालुक्याच्या बाभुळगाव येथे मालवाहू चारचाकी वाहन पुलाखाली कोसळली. या वाहनात 13 प्रवासी होते.

## बसमध्ये बसून चोरी करायच्या, पोलिसांनी आवळल्या मुसक्या




नागपूर : कुकडे ले-आउट येथील नितीन मेश्राम (वय 48) हा चार आरोपी महिलांना आपल्या कारने ने-आण करीत होता. तो शहरातील वेगवेगळ्या बस स्थानकांवर या महिलांना उतरवायचा. त्या बसमध्ये चढल्या की, आपले काम करायच्या. महिलांचे दागिने, पर्स (Women's Jewelry, Purses) लंपास करायच्या. त्यानंतर दागिने घेऊन बसस्थानकावर उतरायच्या. नितीन लगेच कारने जायचा आणि त्यांना परत घेऊन जायचा. शिवाय चोरी केल्यानंतर चोरीचा माल विकण्याची जबाबदारीही नितीनकडे होते. या महिला स्कार्प घालत असल्यानं त्यांचे चेहरे स्पष्ट दिसत नव्हते. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात शोधल्यानंतर बेलतरोडी पोलिसांना (Beltarodi Police) खबऱ्यांची मदत घ्यावी लागली. त्यानंतर आरोपींपैकी कुंठीलालपेठ येथील रहिवासी ललिता बलवीर (वय 50) हिला अटक करण्यात आली. आणखी तीन महिला आरोपी पसार (Three Women Accused Passed) आहेत. त्यांचा शोध आता पोलीस घेत आहेत. ललिताकडून 75 हजार रुपये किमतीचे दागिने जप्त करण्यात आलेत. शहरात गेल्या काही दिवसांपासून बसमधून महिलांचे दागिने, पर्स चोरी जात होते.

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ०८ ते १४ मार्च - २०२२


## अखेर अकोल्यातील 'त्या' दोन बेपत्ता अल्पवयीन मुलींचा शोध लागला!



अकोला: मागील पाच दिवसांपासून बेपत्ता असलेल्या अकोल्यातील पंचशील नगर परिसरातील दोन मुलींचा शोध लावण्यात सिव्हिल लाइन पोलिसांना यश आले आहे. कोणीही अपहरण केले नव्हते, स्वत: घरातून गेल्याचे त्यांनी बाल कल्याण समिती समोर मान्य केले आहे. दरम्यान, शिकवणीसाठी गेलेल्या आठवी आणि सातव्या वर्गातील दोन मुली अचानक बेपत्ता झाले होते. परंतु, बेपत्ता मुलींची तक्रार दाखल करूनही पोलिस हे प्रकरण गंभीर्याने घेत नसल्याचा आरोप बेपत्ता अल्पवयीन मुलीच्या बहिणीने केला होता. यानंतर लागलीच स्थानिक परिसरातील युवकांच्या मदतीच्या आधारे 'त्या' मुलींचा शोध घेण्यात या पोलिसांना यश आले आहे..

काय होता नेमका प्रकार

अकोला शहरातील खरप रोडवरील पंचशील नगरातील दोन अल्पवयीन मुली गेल्या १५ दिवसांपासून याच परिसरातील एका शिकवणी वर्गासाठी जात होत्या. २८ फेब्रुवारी रोजी दोन्ही मुली या संध्याकाळी सहा वाजताच्या सुमारास शिकवणीकरीता घरून गेल्या. 'त्या' नेहमीप्रमाणे आठ वाजता घरी येणे अपेक्षित होते. मात्र, दोघीही घरी न आल्याने आईवडिलांची चिंता वाढली.

## नातेवाईकांच्या साखरपुड्याला जाताना बाईक अपघात, पित्यासह लहान मुलाचाही मृत्यू

धुळे : बाईक अपघातात पिता पुत्राचा मृत्यू (Father Son Death) झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. नातेवाईकांच्या साखरपुड्यासाठी जाताना हा अपघात झाला. धुळ्यातील (Dhule) भडणे फाट्याजवळ हा भीषण अपघात घडला. लहान मुलाला सोबत घेऊन पिता मोटरसायकलने जात होता. यावेळी अज्ञात वाहनासोबत त्यांच्या बाईकची धडक झाली. यामध्ये दुचाकीस्वार पित्याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता की यात बाईकस्वाराचे धड आणि शिर वेगळे झाले. तर गंभीर जखमी झालेल्या लहान मुलाने उपचारादरम्यान प्राण सोडले. वाळू वाहतूक करणाऱ्या डंपर चालकाला शिंदखेडा पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे.नातेवाईकांच्या साखर - पुड्याला जाताना अपघात




प्राथमिक माहितीनुसार धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील विखरण या गावातील विनोद राजपूत हे सुरत येथे कामानिमित्त वास्तव्यास होते. दोन दिवसांपूर्वी सुरत येथून आपल्या गावी आले होते नातेवाईकांच्या साखरपुड्यासाठी विनोद राजपूत हे त्यांचा लहान मुलगा कृष्णासोबत मोटरसायकलने जात होते.

### पित्याचा जागीच मृत्यू, मुलगा उपचारावेळी मृत्युमुखी

यावेळी भडणे फाट्याजवळ भडगाव भागात अज्ञात वाहनासोबत त्यांच्या मोटरसायकलचा अपघात झाला. यात विनोद राजपूत यांचा जागीच मृत्यू झाला, तर मुलगा गंभीर जखमी झाला होता. घटनास्थळी नागरिकांनी धाव घेत मुलगा कृष्णाला रुग्णालयात दाखल केले. तिथून धुळ्याला घेऊन जात असताना मुलाचा मृत्यू झाला.

## सून नव्हे मुलगीच!

### सूनेला किडनी दान करून 62 वर्षीय सासऱ्याने दिले जीवनदान



एकीकडे मुली सर्व क्षेत्रांत कर्तृत्व गाजवत असताना आजही सुनांना सासरी मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात असल्याच्या अनेक तक्रारी पुढे येत असतात. मात्र, उरण तालुक्यातील धुतूम गावातील आगरी समाजातील सासऱ्यांनी आपल्या कृतीमधून सुनेला जीवनदान दिलेच, शिवाय समाजापुढे एक वेगळाच आदर्श ठेवला आहे. ६२ वर्षीय सुधाकर ठाकूर यांनी दोन्ही मूत्रपिंड निकामी झालेल्या आपल्या सुनेला मूत्रपिंडदान करून जीवनदान दिले आहे. त्यांच्या या भूमिकेचे सर्वत्र स्वागत होत असून सर्वच सासरच्या मंडळींनी त्यांचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सुनेला मुलीसारखे जपावे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.२०११ मध्ये स्नेहा सागर ठाकूर लग्न होऊन जसखार गावातून धुतूम गावात ठाकूर कुटुंबीयांची सून म्हणून आली. काही दिवसांपूर्वी स्नेहा ठाकूर हिच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या. तिचे वय आत्ता केवळ ३१ आहे. तिच्यावर आठ महिन्यांपासून डायलिसिस सुरू होते. मात्र, डायलिसिस करण्यावरही मर्यादा येतात. त्यावेळी मूत्रपिंड प्रत्यारोपण हा पर्याय डॉक्टरांनी त्यांना सुचवला. मात्र मूत्रपिंड कोण देणार, हा प्रश्न होता. त्यावेळी आपल्या सुनेला मुलीसारखे जपणाऱ्या प्रभाकर ठाकूर यांनी तिला मूत्रपिंडदान करण्याचा निर्णय घेतला. आपल्या जीवाची पर्वा न करता स्नेहाचे ६३ वर्षीय सासरे प्रभाकर ठाकूर यांनी सुनेला आपली एक किडनी देऊन नवीन आयुष्य दिले.सासऱ्यांमुळे आपल्या आयुष्यात आपण दुसऱ्यांदा बाप पाहिला, अशी भावना स्नेहाने व्यक्त केली. सासरा आणि सुनेच्या नात्याचा समाजासमोर एक नवा आदर्श या कृतीतून समोर आला आहे. अपोलो रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया पार पडली असून रक्तगट विसंगत असतानाही डॉ. रवींद्र निकालजे व डॉ. अमोल कुमार पाटील ह्यांच्या मार्गदर्शनाखाली किडनी प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. सुनेला मूत्रपिंडदान करण्याच्या एक धाडसी आणि कौतुकास्पद निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

## धावती लोकल पकडण्याचा प्रयत्न अंगलट, पाय घसरुन पडलेल्या तरुणीला पोलिसांनी वाचवलं

तरूणी दुपारच्या सुमारास मालाड स्थानकात चर्चेगेटला जाण्यासाठी आली होती. त्यावेळी तिला चर्चेगेटच्या बाजूने जाणारी बोरिवली लोकल दिसली. ती बोरिवलीली जाणारी लोकल मालाडच्या फलाट क्रमांक 1 वरती होती. धावत असलेल्या लोकल तिने पकडण्याचा प्रयत्न केला.

मुंबई – धावती लोकल (local) पकडत असताना तरूणीचा पाय घसरला आणि तो कोसळत असल्याचा व्हिडीओ (video) सीसीटिव्हीत (cctv) कैद झाला आहे. ही घटना 2 मार्चला मालाड (malad) स्थानकात घडली असून त्या मुलीचं वय 17 आहे. तरूणीला वाचवण्यात रेल्वे पोलिसांना यश आल्याचे पाहायला मिळत आहे. तरूणी मालाडहून चर्चगेटला जाणारी लोकल धावत जाऊत पकडत होती, त्यावेळी तिथं तिचा पाय घसरला आणि कोसळली त्यावेळी तिथं कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांनी पाहिले





आणि तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. तात्काळ रेल्वे रूळाच्या दिशेने जात असलेल्या मुलीला बाहेर खेचले त्यामुळे तीचा जीवदान मिळाले आहे. पोलिसांनी दाखवलेल्या धाडसामुळे मुलीला कसल्याही प्रकारची दुखापत झालेली नाही. तसेच मुलीने ज्या पोलिसांनी तिचे जीव वाचला त्याचे आभार मानले आहेत. मुंबईत अशा घटना नेहमी घडत असतात, अनेकदा लोकलला गर्दी असल्यानंतर असल्यानंतर अशा घटना घडत असतात. तर काहीवेळेला लोकलच्या दरवाजात उभे राहून स्टंट करणा-यांच्या बाबतीत अशा घटना घडत असतात.

नेमकं काय घडलं

तरूणी दुपारच्या सुमारास मालाड स्थानकात चर्चेगेटला जाण्यासाठी आली होती. त्यावेळी तिला चर्चेगेटच्या बाजूने जाणारी बोरिवली लोकल दिसली. ती बोरिवलीली जाणारी लोकल मालाडच्या फलाट क्रमांक 1 वरती होती. धावत असलेल्या लोकल तिने पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु तिचं अंदाज चुकला आणि पाय घसरला. त्यावेळी ती पाहणा-यांनी आरडाओरड केली. तसेच समोर बसलेल्या पोलिसांनी तिकडे धाव घेतली. ती रेल्वे रूळाकडे जाणार होती तेवढ्यात तरूणीला इंगवले, सातव, रणखंबे आणि पाटील यांनी बाहेर खेचले. त्यावेळी पोलिसांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. त्याचबबरोबर तरूणीला कसलीही दुखापत झालेली नाही. त्यामुळे वाचवल्यानंतर इंगवले, सातव, रणखंबे आणि पाटील या पोलिसांचे आधार मानले असून कर्तव्य प्रमाणिकपणे करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

पोलिसांचं कौतुक

लोकलच्या परिसरात किंवा लोकलमध्ये एखादी घटना घडल्यानंतर त्याचा छडा लावण्याच मुंबई पोलिस कायम तत्पर असल्याचे आपणास अनेक घटनांमधून पाहायला मिळाले आहे. मागच्या आठ दिवसांपूर्वी नालासोपारा रेल्वेस्थानकाच्या परिसरात एका महिलेची तरूणाने छेड काढली होती. त्यावेळी तो घटनास्थळावरून पळून गेला असल्याचे व्हिडीओत दिसत होते.

## बारावीच्या परीक्षेसाठी निघाला होता, वाटेत काळाने गाठलं, होत्याचं नव्हतं झालं!



उस्मानाबाद : बारावीच्या परीक्षेला निघालेल्या विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू झालाय. ही दुर्दैवी घटना उस्मानाबादेत घडली आहे. तुळजापूर-नळदुर्ग या नॅशनल हायवे क्रमांक 206 वरती हा अपघात झाला. अर्जुन गोविंद राठोड असं मृत विद्यार्थ्यांचं नाव आहे. सदरील विद्यार्थी मोटारसायकलने बोरनदीवाडी येथून परीक्षेसाठी नळदुर्ग येथे निघाला होता. यादरम्यान गांधोरा पाटीजवळ आल्यानंतर कंटेनर क्रमांक आर. जे 32. जी. सी. 0545 या वाहनाने मोटरसायकला जोराची धडक दिली. यात अर्जुनचा जागीच मृत्यू झाला.

आपल्याकडून विद्यार्थी चिरडला गेला असल्याचं लक्षात येताच काही क्षणांत कंटेनर चालक घटनास्थळावरुन फरार झाला. आसपासच्या लोकांनी चालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण चालक पळून जाण्यात यशस्वी झाला. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरु आहे.

अर्जुन बोरनदीवाडीमध्ये राहायला होता. लहानपणापासून तो शांत आणि संयमी होता. अभ्यासाची त्याला रुची होता. वर्षभर अभ्यास करुन जोमात परीक्षा द्यायची आणि मोठं होऊन चांगली नोकरी करायची, असं त्याचं स्वप्न होतं. पण परीक्षेच्या काही तास आधी होत्याचं नव्हतं झालं. अर्जुनला काळाने गाठलं...!

## कल्याणमध्ये गुन्हेगारांवर व्यापारी-पोलिसांचा 'तिसरा डोळा', मोक्याच्या ठिकाणी लावणार सीसीटीव्ही कॅमेरे





अशोक होनमाने, पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील, ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष राकेश मुथा यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी कल्याणमधील सर्व व्यापारी उपस्थित होते.

मोक्याच्या ठिकाणी 25 सीसीटीव्ही बसवणार

व्यापारी वर्गाने दिलेल्या सहकार्यातून बाजारपेठ परिसरातील मोक्याच्या ठिकाणी 25 सीसीटीव्ही कार्यक्रम बसविले जाणार आहेत. एक कॅमेरा देशासाठी आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असल्याची बाब वरिष्ठ पोलिस निरीक्षक होनमाने यांनी अधोरेखित केली. तिसरा डोळा कार्यान्वीत झाल्याने बाजारपेठ परिसरात घडणाऱ्या गुन्ह्यावर देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. तसेच काही गुन्हा घडल्यास आरोपी पकडण्याकरीता सीसीटीव्हीची मदत होणार आहे.

कल्याण : कल्याण शहर ज्वेलर्स असोसिएशनच्या वतीने शहरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्यात येणार आहे. या कामाचा शुभारंभ आज पोलिस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला. 'एक कॅमेरा देशासाठी आणि समाजासाठी' या संकल्पनेतून हे सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाच्या ठिकाणी लावण्यात येणार आहेत. जेणेकरून गुन्हेगारी (Crime)ला आळा बसण्यास मदत होईल. कल्याण-डोंबिवली शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एकीकडे पोलिस दिवसरात्र प्रयत्न करत आहेत तर दुसरीकडे आता व्यापारी देखील पोलिसांच्या मदतीला पुढे आले आहेत. एक कॅमेरा देशासाठी आणि समाजासाठी ही संकल्पना पोलिसांनी सुरू केली आहे. कल्याणचे ॲडिशनल सीपी दत्तात्रेय कराळे, पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही संकल्पना संपूर्ण शहरात राबवली जात आहे.

नव्या संकल्पनेला व्यापाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद

या संकल्पनेला कल्याण-डोंबिवलीतील व्यापाऱ्यांनी देखील चांगला प्रतिसाद दिला आहे. कल्याण पश्चिमेतील सर्वात महत्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी 25 सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. त्याचा शुभारंभ आज कल्याणमध्ये करण्यात आला. भाजी मार्केटमधील एका हॉटेलच्या सभागृहात आयोजित सभारंभात वरिष्ठ पोलिस निरिक्षक


व्यापारी वर्गाने दिलेल्या सहकार्यातून बाजारपेठ परिसरातील मोक्याच्या ठिकाणी 25 सीसीटीव्ही कार्यक्रम बसविले जाणार आहेत. एक कॅमेरा देशासाठी आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असल्याची बाब वरिष्ठ पोलिस निरीक्षक होनमाने यांनी अधोरेखित केली. तिसरा डोळा कार्यान्वीत झाल्याने बाजारपेठ परिसरात घडणाऱ्या गुन्ह्यावर देखरेख ठेवणे शक्य होणार आहे. तसेच काही गुन्हा घडल्यास आरोपी पकडण्याकरीता सीसीटीव्हीची

मदत होणार आहे. कॅमेऱ्यामुळे 24 तास तिसऱ्या डोळयाच्या माध्यमातून सुरक्षेची हमी मिळणार आहे. महात्मा फुले पोलिस ठाण्याच्या हद्दीत पाच पोलिस बीट आहेत. या पाच पोलिस बीटमध्ये व्यापारी आणि नागरिकांच्या सहभागातून 394 ठिकाणी सीसीटीव्ही लावण्यात आले आहे. या सीसीटीव्हीच्या सहाय्याने पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या गुन्ह्यांची उकल करण्यास मदत होत असल्याचे होनमाने यांनी सांगितले.

## व्याजाच्या पैशातून वादावादी, कर्जदारांकडून तरुणाची हत्या





जयपूर : प्राथमिक तपासात एकही पुरावा दिसत नसताना पोलिसांनी एका हत्या प्रकरणाचा उलगडा केला आहे. राजस्थानातील झालावाड (Rajasthan Crime) जिल्ह्यातील सुनेल भागात पोलिसांनी हत्येचं गूढ उकललं. दूबलिया-रायपूर मार्गावर एका व्यक्तीची धारदार शस्त्राने भोसकून हत्या (Murder) करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी एका अल्पवयीन मुलासह एकूण तिघा आरोपींना अटक केली आहे. कर्जावर घेतलेल्या रकमेच्या व्याजावरुन झालेल्या वादातून (Interest on Loan) ही हत्या झाल्याचं समोर आलं आहे.

**काय आहे प्रकरण?**

32 वर्षीय दुर्गाप्रसाद उर्फ दुर्गेश आणि 20 वर्षीय सुनील यांना अटक करण्यात आली आहे. तर एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी सुनेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुबलिया परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात सापडला होता. मृतदेहाचा गळाही धारदार शस्त्राने चिरण्यात आला होता. राधेश्याम डांगी असे मृताचे नाव असून तो मध्य प्रदेशच्या सीमावर्ती भागातील सोय कलान पोलीस स्टेशन क्षेत्रातील लुहरिया गावचा रहिवासी आहे.

**व्याजाच्या पैशावरुन वाद**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत राधेश्याम हा व्याजावर पैसे द्यायचा. त्याने आरोपी दुर्गाशंकर आणि सुनील यांना व्याजावर पैसेही दिले होते.

## पैसा माझ्या एकटीच्या घशात जाणार नाही वरपर्यंत पाठवायचेत, लाचखोर ड्रग्ज निरीक्षकाचा निर्लज्जपणा

जयपूर : लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (Anti Corruption Bureau) महिला औषध निरीक्षकाला लाच (Lady Drugs Inspector Bribe) घेताना रंगेहाथ पकडले आहे. पाच हजार रुपयांची लाच स्वीकारताना ड्रग्ज इन्स्पेक्टर सिंधू कुमारी (Sindhu Kumari) जाळ्यात सापडली. राजस्थानची राजधानी जयपूरमध्ये हा प्रकार उघडकीस आला आहे. ही रक्कम माझ्या एकटीसाठी नाही, मला वरपर्यंत पैसा द्यावा लागतो, नाही दिल्यास बिकानेरला बदली होईल, असं तिने अटकेनंतर निर्लज्जपणे सांगितलं. अटक करण्यात आलेल्या सिंधू कुमारीवर जयपूरमधील 500 मेडिकल



स्टोअर्सची तपासणी करण्याची जबाबदारी होती. ती प्रत्येक दुकानातून दरमहा पाच हजार रुपये वसूल करत असे. दहा दिवसांपूर्वी एका औषध दुकान मालकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती की, अनेक वर्षांपासून सिंधू कुमारी आपल्याकडून महिन्याला पाच-पाच हजार रुपये उकळत आहे.

काय आहे प्रकरण?

"आजपर्यंत कधीही कुठले औषधाचे दुकान तपासले नाही, त्यांची फक्त घरी येऊन पैसे देण्याची मागणी असायची. छोटी-छोटी कामं करायची असली, तरी प्रत्येक कामासाठी ती पैसे मागायची. औषध दुकानात नवीन कर्मचारी ठेवायचा असेल तरी त्या बदल्यात ती पैसे मागायची, कारण नियमानुसार राज्य निरीक्षकांना याची माहिती द्यावी लागते" असं एका औषध दुकानदाराने सांगितलं. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तक्रारीची सलग सात दिवस चौकशी केली आणि ती खरी असल्याचे आढळून आले, त्यानंतर 10 हजार रुपयांची लाच मागणाऱ्या सिंधू कुमारीचा माग काढण्यासाठी सापळा रचण्यात आला.

एसीबीने आरोपी महिलेला पैसे गोळा करण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये बोलावले आणि तिथे तिला रंगेहाथ पकडले. सिंधू कुमारी मूळची बिहारची असून जयपूरमध्ये कार्यरत आहे.

कार्यालयात बैठक, सिंधू कुमारी लाच घ्यायला

ड्रग इन्स्पेक्टर सिंधू कुमारी लाच घेत असताना वैद्यकीय विभागात बैठक सुरू होती. तिला बोलावले जात होते मात्र ती लाच घेण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये गेली होती. सिंधू कुमारीचा औषध विभागात फार दरारा होता. जयपूरच्या सर्वात मोठ्या वैद्यकीय व्यवसायाची बाजारपेठ सेठी कॉलनीची जबाबदारीही तिच्याकडे होती.

सिंधू कुमारीचा दबदबा

इन्स्पेक्टर असूनही गाडी, ड्रायव्हर अशा सुविधा तिला देण्यात आल्या होत्या. मागच्या वेळी जेव्हा कोरोनामध्ये रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा तुटवडा होता, तेव्हाही औषध विभागाने त्याची संपूर्ण जबाबदारी ड्रग इन्स्पेक्टर सिंधू कुमारीकडे दिली होती.

## शहरात दिवसभरात विविध ठिकाणी आगीच्या 4 घटना

पुणे- शहरात आगीच्या घटनांमध्ये दिवंसेदिस वाढ होताना दिसून येत आहे. चिंचवड रेल्वे स्टेशन(Chinchwad Railway Station) जवळील पाच दुकानांना आग लागल्याची घटना घडली आहे लागली. या आगीमध्ये पत्र्याच्या शेडची असलेली ही दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत. शॉर्टसर्किटमुळे ( short circuit) आग लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली. आग लागल्याची ,माहिती मिळताच अग्नीशामक जवान घटना स्थळावर दाखल झाले. अग्नीशामक दलाच्या प्रयत्नानंतर 1 तासात आग आटोक्यात आली आहे. या आगीमध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसली



तरी लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यानंतर बालेवाडी स्टेडियम (Balewadi Stadium) येथील स्टाफ क्वार्टर्स नजीक गवत पेटल्याने शेजारीच टाकाऊ वस्तु ठेवलेल्या एका बंद खोलीत आग लागल्याची घटनाही नुकतीच घडली आहे.दापोडी रेल्वे स्टेशन येथे रीले रूममध्ये आग दापोडी रेल्वे स्टेशन येथे सिग्नल यंत्रणाअसलेली रीले रूममध्ये आग लागल्याची घटना नुकतीच घडली.



संपादकीय...

## राजकीय धूलिवंदन

राज्य मागासवर्ग आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाकरिता २७ टक्के जागा आरक्षित ठेवण्याच्या केलेल्या शिफारशी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत, ८०० ग्रामपंचायती, पाच महानगरपालिका; तसेच १०० नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या जागा खुल्या प्रवर्गात आणून निवडणुका घ्याव्यात, असे राज्य निवडणूक आयोगाला आदेश दिले आहेत. या निर्णयाने आधीच वाढलेल्या राजकीय तापमानात विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना भरच पडणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण हे ५० टक्क्यांपेक्षा अधिक होत आहे, या विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेवरून सुरू झालेला तिढा सध्या तरी सुटण्याची शक्यता नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या त्रिसूत्रीनुसार, राज्याने मागासवर्ग आयोगाची निर्मिती करून, वस्तुस्थितीजन्य माहितीच्या आधारे मागासवर्गीय




असण्याबाबत चौकशी करायची होती. त्यानुसार राज्याने आयोग नेमला. वस्तुस्थितीजन्य आकडेवारी (इम्पिरिकल डेटा) ही खरे तर जनगणनेमुळे केंद्र सरकारकडे असल्याचे या विषयातील अभ्यासकांचे म्हणणे होते. केंद्राने त्या आकडेवारीबाबत, ती जनगणना कायद्यांतर्गत गोळा केल्याचे म्हणत व स्वतःच अनेक शंका उपस्थित करीत, ती देण्यास असमर्थता दर्शवल्याने घोळ झाला. राज्याकडील आकडेवारी सरकारने संबंधित आयोगाला दिली व त्यानुसार आयोगाने शिफारस केली. यात राजकीय मागासलेपणाबाबतचा उल्लेख नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर आणि सी. टी. रवीकुमार यांनी नोंदवल्याने, हे सगळे प्रयत्न फोल ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेसचे नरसिंह राव पंतप्रधान असताना, ७३ व ७४वी घटनादुरुस्ती करून, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येनुसार आरक्षण देण्यात आले. ओबीसींनाही आरक्षण देण्याचा निर्णय राज्यांनी घ्यावा, असे यात म्हटले होते. याच घटनादुरुस्तीबाबत सर्वोच्च न्यायालयात चाललेल्या कृष्णमूर्ती खटल्यात, ओबीसी हे मागासवर्गीय असून त्यांना आरक्षण मिळणे गरजेचे आहे; त्यासाठी वस्तुस्थितीजन्य आकडेवारी असायला हवी, असे न्यायालयाने म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयानेच इंद्रा सहानी खटल्यात आरक्षणाची मर्यादा पन्नास टक्क्यांपेक्षा ओलांडता येणार नाही, असेही नमूद केले. राज्यातील स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये, १९९३मध्ये ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण दिल्याने, काही जिल्ह्यांमध्ये ही ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली. आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये, घटनेनुसार (पेसा कायदा) आदिवासींना अधिक आरक्षण द्यावे लागत असल्याने, ओबीसींचे आरक्षण कमी करणे गरजेचे होते. ते केले गेले नाही; कारण त्याबाबत आवश्यक आकडेवारी जमा करण्याची तोशीश कुणालाच नको होती. राज्यातील ओबीसींची मोठी संख्या पाहता, राजकीयदृष्ट्याही ते परवडणारे नव्हते. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत संकेत दिल्यानंतरही, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, सर्वोच्च न्यायालयाचा भविष्यातील निकाल विरोधात गेल्यास तो मान्य करण्याचे शपथपत्र निवडणूक आयोगाला दिले. आकडेवारी गोळा करण्याचे काम मात्र त्यांच्या सरकारनेही केले नाही.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर, ओबीसी आरक्षणाशिवायच निवडणुका घ्याव्या लागणार, हे स्पष्ट आहे. 'ही चूक तुमचीच आहे,' हे तुणतुणे आता दोन्ही बाजूंकडून वाजवले जाणार. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ हे गोपीनाथ मुंडे यांच्यानंतरचे सर्वांत मोठे ओबीसी नेते असल्याने, त्यांच्याभोवती राष्ट्रवादी काँग्रेस मोठी ताकद उभी करण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पक्षाने राज्यातील मराठा प्रभावित राजकारणाला 'माधव' (माळी, धनगर, वंजारी) या समीकरणातून छेद देण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच गोपीनाथ मुंडे, एकनाथ खडसे यांच्यासारखे नेतृत्व तयार झाले. सहकार चळवळीच्या माध्यमातून राज्याच्या राजकारणावर पक्की मांड ठोकलेल्या काँग्रेसला या नेत्यांनी जेरीस आणले. नरेंद्र मोदींच्या झंझावातानंतर देशातील राजकारण पूर्णपणे बदलले आहे. महाराष्ट्र भाजपचा चेहराही बदलला आहे. आज भाजपकडे राज्यात मोठा ओबीसी नेता नसला, तरी देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास असलेले व अत्यंत चाणाक्ष राजकीय नेतृत्व करीत आहे. या निकालाचे सगळे ओझे ठाकरे सरकारच्या खांद्यावर कसे टाकायचे व त्यासाठी राजकीय माहोल कसा उभा करायचा, यात फडणवीस निष्णात आहेत.

## आपली गरज काय नि आपण जातोय कुठे?




कर्नाटकमधल्या हावेरी जिल्ह्यातला चलागेरी इथला अवघ्या २१ वर्षांचा नवीन युद्धात मृत्यू पावला. तो सैनिक नव्हता. मातृभूमीपासून हजारो मैल दूर परक्या देशात गेलेला तो चौथ्या वर्षांचा वैद्यकीय शिक्षण घेणारा मुलगा होता. त्याच्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांवर गारूड असते 'गुड डॉक्टर', 'ग्रे ॲनाटॉमी'सारख्या वेबसीरिजमध्ये दिसलेल्या मोहमयी आयुष्याचे. चकचकीत हॉस्पिटल, चमकदार टेक्नॉलॉजीचे. सुपरस्पेश्ॅलिटीचे, कार्पोरेट हॉस्पिटलचे.

रशिया-युक्रेन युद्धाची भारतात दखल घेतली जात आहे ती एका तटस्थतेने आणि अर्थातच आपल्यासाठी पुढे काय वाढून ठेवले आहे याच्या धास्तीने. पण नवीनच्या मृत्यूची खुद्द पंतप्रधानांना नोंद घ्यावीशी वाटली. त्यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, भारतात खासगी क्षेत्रात जास्तीत जास्त वैद्यकीय महाविद्यालये उभारली जावीत; जेणेकरून अशा नवीनना असे हजारो मैल दूर परक्या देशात जावे लागणार नाही.नवीन एकटा नाही. २० हजार तरुण मुले-मुली तिथे बंकरमध्ये/ आपापल्या हॉस्टेलमध्ये जीव मुठीत घेऊन वाट पाहात आहेत की आपल्याला घरी कधी परत जाता येईल? ही भयाण रात्र कधी संपेल? त्यांचे आई-वडील, नातेवाईक, मित्रमैत्रिणी देव पाण्यात घालून अधीरतेने त्यांच्या परतण्याची वाट पाहात आहेत.हे झाले युक्रेनचे. कारण तिथे युद्ध सुरू आहे. पण रशिया, मलेशिया, जॉर्जिया, कझाकिस्तान आणि चीन या देशांतसुद्धा भारतातील हजारो मुले-मुली वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. करोनाची सुरुवातच मुळी वुहानला मेडिकल कॉलेजमध्ये शिकणारी मुलगी केरळमध्ये पोहोचताना पॉझिटिव्ह सापडल्याने झाल्याचे काहीना आठवत असेल. तेव्हा युक्रेनमध्ये अडकलेल्या या आपल्या मुलामुलींसाठी आज आपले आतडे तुटले तरी या प्रश्नाची निरगाठ नेमकी सोडवावी लागेल, तरच पुढचा मार्ग सापडेल.आमच्या काळात खासगी वैद्यकीय महाविद्यालये नव्हती. एखादेच मणिपाल वगैरे. तेव्हा आम्ही सरकारी महाविद्यालयात ॲडमिशन घेत होतो. वर्षांला हजार रुपये फी होती. त्या वेळी अंडरग्रॅज्युएट वैद्यकीय शिक्षणासाठी बाहेरच्या देशात जायचे नाहीत. पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी काही अतिश्रीमंत घरातले अमेरिका/ इंग्लंडमध्ये जायचे. हा सुखाचा काळ १९९०च्या आसपास संपला. खासगी क्षेत्रात वैद्यकीय महाविद्यालयांना प्रोत्साहन देण्याचे सरकारी धोरण अमलात येऊ लागले. १९८० मध्ये जवळपास १०० वैद्यकीय महाविद्यालये होती आणि त्यातली फक्त ११ (१० टक्के) खासगी होती. आज ५४१ आहेत आणि त्यापैकी २४३ (५० टक्के) खासगी क्षेत्रात आहेत! खासगी वैद्यकीय महाविद्यालयांपैकी किती महाविद्यालये (सर्वपक्षीय) राजकीय नेत्यांशी संबंधित आहेत ते बघितले तर हे लक्षात येईल की, या सरकारी धोरणामुळे बाकी जे काही बरे-वाईट व्हायचे ते झालेच; पण या धोरणामुळे राजकीय पुढाऱ्यांना एक सोन्याची अंडी देणारी कोंबडी मिळाली! पूर्वी भारतात सोन्याचा धूर निघे असे म्हणतात, पण वर्तमानकाळातच खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचा हा सोन्याचा धूर इतका निघाला की, वैद्यकीय क्षेत्रावर नियंत्रण ठेवायचे आपले काम विसरून मेडिकल काउंसिल ऑफ इंडियाचे (एमसीआय) पदाधिकारी खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या सेवेत रुजू झाले. इतके की राज्यसभा समितीने एमसीआय बरखास्त करण्याचा सल्ला दिला. ती बरखास्त केली गेली, तिच्या जागी 'नॅशनल मेडिकल कमिशन' आले; पण सरकारी धोरण काही बदलले नाही. वैद्यकीय सेवा बाजारात उभी आहे ती आहेच. कॉर्पोरेट हॉस्पिटलना पायघड्या घातल्या जात आहेतच. या बाजाराला एक्स्पर्ट मजूर पुरवण्यासाठी खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना रेड कार्पेट घातले जात आहे. ८२९२६ सीटपैकी निम्म्या खासगी क्षेत्रात आहेत. हे ४० हजार डॉक्टर लाखो रुपये खर्च करून सरकारपुरस्कृत वैद्यकीय सेवेच्या बाजारात उतरणार आहेत. आपली 'इन्व्हेस्टमेंट' या ना त्या मार्गाने वसूल करणार आहेत.पण एखाद्या मुला/मुलीला मुळात लाखो रुपये भरून वैद्यकीय शिक्षण घ्यावेसे का वाटते? साधे उत्तर आहे की समाजात डॉक्टर या शब्दाभोवती वलय आहे. डॉक्टर झाल्यावर सामाजिक उच्च स्तर मिळतो. काही वर्षांत महाग गाडी दारात उभी रहाते. फार्मा कंपन्यांच्या कृपेने अझरबैजान/ थायलंडच्या ट्रिप करता येतात. आणि हो, ज्यांना हवा आहे त्याना चांगला हुंडा मिळतो. या व्यवसायाला मरण नाही. निती आयोग आपल्या पत्रकात म्हणते तसे या मार्केटमध्ये 'कॅप्टिव्ह गिऱ्हाईक' आहे. करोनाच्या काळात काही सन्माननीय अपवाद वगळले तर याच कॅप्टिव्ह गिऱ्हाईकांच्या जोरावर कोटी कोटी रुपयांचा धंदा झाला. जरा कानोसा घेतला तर पेशंट केंद्रिबदू ठेवून जनरल प्रॅक्टिसमध्ये/ आदिवासी भागात/ सरकारी नोकरीत/ ग्रामीण भागात जाऊन 'प्रकाश बाबा आमटे' व्हायचे स्वप्न अगदी विरळाच मुले-मुली पाहातात असे दिसते. आणि त्यांना दोष का द्यायचा? जे समाजाच्या आडात तेच या तरुण मुलामुलींच्या पोहऱ्यात येणार. पण फक्त मुला-मुलीने स्वप्न बघून चालत नसते. त्याच्या आई-वडिलांनी ते बघावे आणि पेलावे लागते. वस्तुस्थिती ही आहे की, 'नीट'मध्ये ७२० पैकी २५० मार्कसुद्धा न मिळवू शकणाऱ्या आपल्या पाल्याची स्वप्ने किंवा बहुतेक वेळा मुलांमार्फत आपलीच स्वप्ने पुरी करण्याचा ध्यास आणि आवश्यक असा भरभक्कम खिसा ज्यांचा आहे ते पालक पैसा टाकून मुलाला/ मुलीला डॉक्टर करण्याच्या राजरस्त्यावर वळतात.

फक्त एमबीबीएस व्हायला भारतात खासगी महाविद्यालयात लागतात साधारण साठ लाख. आणि तेसुद्धा 'नीट'मध्ये काही किमान मार्क मिळवल्यावर. खासगी कोटय़ातून जायचे तर कोटीसुद्धा. काही पालक त्यामानाने कमी खर्चीक आयुर्वेद किंवा होमिओपॅथीचा मार्ग स्वीकारतात. त्या पॅथीचा ध्यास घेतलेले कमीच. बहुतांशी आयुर्वेद/ होमिओपॅथीच्या आडवळणाने मॉडर्न मेडिसिनला- ॲलोपॅथीला- मागच्या दाराने प्रवेश घेतला जातो. अभ्यासक्रमात न अभ्यासलेली पण मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हने शिकवलेली मॉडर्न मेडिसिनची औषधे सुखेनैव वापरून यशस्वी जनरल प्रॅक्टिस केली जाते. भारतातल्या खासगी महाविद्यालयात काही सन्माननीय अपवाद सोडले तर एकूण आनंदीआनंद असतो. प्राध्यापकांची कमतरता असते. पण मुख्य म्हणजे काही महाविद्यालयांत पेशंटच दिसत नाहीत! त्यामुळे डिग्री मिळते पण प्रत्यक्ष अनुभव खूप कमी. ज्यांचा खिसा भक्कम असतो त्यांना भारतात ॲडमिशन घेता येते अगदी कोटी कोटी रुपये भरून..

..पण काही पालक मधले असतात. त्यांना नाइलाजाने युक्रेनसारखा वेगळा रस्ता स्वीकारावा लागतो. कारण? बिल क्लिंटन म्हणाले तेच झ् ''इटस इकॉनॉमी, स्टुपिड!'' फी आणि राहण्याचा खर्च पकडूनसुद्धा युक्रेनसारख्या देशात 'एमबीबीएस' व्हायला फक्त तीस लाखांच्या आसपास खर्च येतो. भारतातील खासगी महाविद्यालयांच्या निम्मा. इतकी रक्कम भारतातल्या छोटय़ा शहरांतले मध्यमवर्गीय पालक एज्युकेशन लोनसकट उभारू शकतात. अनेक जण आपले व आपल्या पाल्याचे स्वप्न पुरे करायला जमिनी विकतात, कर्ज घेतात. नव्हे; असे लोन घेतलेले हजारो विद्यार्थी आता उघडय़ावर येणार आहेत. या वीस हजार विद्यार्थ्यांमुळे भारतातून फक्त युक्रेनमध्ये गेलेली रक्कम आहे अंदाजे पाच हजार कोटी! रशिया-मलेशिया- युक्रेन जॉर्जिया असा हा रस्ता गेल्या तीस वर्षांत पक्का रुळला आहे. निम्म्या खर्चात युक्रेनमधून एमबीबीएस व्हा, परत येऊन भारतातली परीक्षा द्या. पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी 'नीट' द्या. आणि मार्क्स मिळाले नाहीत तर काही कोटी देऊन इथल्या खासगी महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएशन करा. अगदीच गेला बाजार आपल्या खर्चाच्या अवघ्या काही टक्के खर्च करून आयुर्वेद /होमिओपॅथीच्या स्पर्धेत जनरल प्रॅक्टिस करा.

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या पिंपळनेर शाखेत मोठा अपहार, बँकेतील चौघांवर गुन्हा दाखल




सोलापूर : गोरगरिबांची बॅंक अशी ओळख असलेल्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँके (Solapur District Central Bank)च्या माढा तालुक्यातील पिंपळनेरच्या शाखेत येथील 55 ग्राहकांच्या खात्यातून त्यांच्या परस्पर 78 लाख 19 हजार 529 रुपये काढून बँकेची फसवणूक (F r a u d ) केल्याप्रकरणी शाखाधिकाऱ्यासह चौघांवर कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. विशेष म्हणजे खातेदारांच्या खोट्या सह्या व अंगठे करुन त्यांचे नावे पैसै काढल्याची खोटी वाऊचर तयार केली आहेत.

खोटी व बनावट दस्तऐवज तयार करुन ठकबाजी करुन 55 खातेदारांच्या खात्यातून परस्पर रक्कमा काढल्या आहेत. तसेच मुदत ठेव पावत्या देखील बोगस तयार केल्याचे समोर आले आहे.

अधिकाऱ्यांनी परस्पर पैसै काढून अपहार केला

बँकेतील ग्राहकांच्या खात्यातूनच बँकेतील अधिकाऱ्यांनी परस्पर पैसै काढून अपहार केल्याच्या गैरप्रकारामुळे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झालंय. या शाखेतील इतरही खात्यांचे लेखापरीक्षण सुरु असून त्यानुसार अपहाराच्या रकमेत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. बँकेचे सीनियर इन्स्पेक्टर व्यंकटराव मदनराव पाटील यांनी शुक्रवारी रात्री कुर्डूवाडी पोलिसांत फिर्याद दिली असून अपहाराचा गुन्हा दाखल झाला आहे. शाखाधिकारी नवनाथ दगडे, क्लार्क चतुर्दास बैरागी, बँक इन्स्पेक्टर अनिल बाबर, क्लार्क दत्तात्रय वरपे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

18 नोव्हेंबर 2021 रोजी तानाजी सरकाळे हे या शाखेत पासबुक घेऊन पैसे काढण्याकरीता आले असता त्यांच्या पासबुकावरील रक्कम बँकेतील संगणकावर दिसून येत नव्हती.

**दोषींवर गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु**

याबाबत तक्रार आल्यानंतर बॅंकेच्या अधिकाऱ्यांनी देखील तक्रारीचे दखल घेऊन जिल्हा बँकेचे प्रशासक शैलेश कौथमिरे यांनी शाखेस भेट देऊन दप्तराची तपासणी केली होती. त्यानंतर आता गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु झालीय. बँकेतील शाखाधिकारी, बँक इन्स्पेक्टर व क्लार्क यांनी संगनमताने बऱ्याच खात्यातून रकमा काढून स्वतःच्या फायद्याकरीता वापरल्या. याशिवाय मयत व्यक्तींच्या खात्यातील, मुदतठेव पावत्या, शेती कर्जातील रकमा, स्वतः परस्पर काढून इतर नातेवाईकांच्या व माहितीतील व्यक्तींच्या खात्यावर वर्ग करुन त्या व्यक्तींच्या खात्यातील या रक्कमा स्वतः परस्पर काढून घेतल्याचे दिसत आहे. या रक्कमा काढण्याबाबत संबंधित खातेदारांनी चतुर्दास बैरागी यांना कोणतेही अधिकार पत्र व संमती दिलेली नाही. याप्रकाराबाबत फिर्यादींनी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिति दिली असता बँकेने या प्रकरणाचा फॉरेन्सीक ऑडिट करण्याकरीता अमित लंगोटे (सीए) यांना नेमण्यात आले होते. या तपासणीत तथ्य आढळल्याने फिर्यादी व्यंकटराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघांवर अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आलाय.

आरोपींना अद्याप अटक केलेली नसून आज अटकेची प्रकिया सुरु होणार असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली.


MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
Water Supply Department
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhayandar (W) 401101, Tal. Dis – Thane, 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

No.MNP/WS/64/2021 -22

Date – 04/03/2022

**// Tender Notice //**

Mira – Bhaiander Municipal Corporation's Water Supply Department has invited the tender for various works under water supply. The tender documents are available on http:/Mahatenders.gov.in website from 08/03/2022 to 14/03/2022 till 12.00 hrs. Tender shall submitted on http:/Mahatenders.gov.in website on or before 14/03/2022 upto 1.00 hrs.

**"100 टक्के मतदान ! हिच लोकशाहीची शान !"**

Ref No.: MBMC/PRO/562/2021-22
Date : 07/03/2022

Sign/-
Executive Engineer
Water Supply Department
Mira Bhayander Municipal corporation

## नालासोपाऱ्यात तीन वर्षांच्या चिमुरड्यासह पित्याचा लोकलखाली आत्महत्येचा प्रयत्न



नालासोपारा : नालासोपारा आणि वसई रेल्वे स्थानकादरम्यान एका पित्याने आपल्या तीन वर्षाच्या चिमुरड्यासह लोकल (Local) ट्रेनखाली येवून आत्महत्ये (Suicide)चा प्रयत्न केला असल्याची धक्कादायक घटना रविवारी पहाटे घडली आहे. यात पिता गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक (Critical) आहे. तर तीन वर्षाच्या चिमुरड्याचा यात मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे. राजीव वाघेला असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या पित्याचे नाव असून, कृष्णा वाघेला असे मयत झालेल्या 3 वर्षाच्या चिमुरड्याचे नाव आहे. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही. पोलिस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

आत्महत्येचे कारण अद्याप अनभिज्ञ नालासोपारा पूर्वेला वाघेला कुटुंबीय राहतात. राजीव वाघेला यांनी रविवारी पहाटे 5 वाजून 11 मिनिटांनी विरार चर्चगेट लोकल खाली उडी घेत आपला तीन वर्षाचा मुलगा कृष्णा वाघेला याच्यासह आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. यात दुर्दैवाने तीन वर्षाचा लहानगा कृष्णा वाघेला हा मयत झाला असून, राजीव वाघेला याची स्थिती चिंताजनक आहे.

# रेल्वे सुरक्षा बलाची मोठी कारवाई

## 3 किलो सोने, 27 किलो चांदी जप्त ! बिहारच्या आरोपींना चंद्रपुरात अटक

नागपूर : तामिळनाडूमध्ये दरोडा टाकणाऱ्या बिहारच्या आरोपींना अटक (Bihar accused arrested) करण्यात आली. रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांनी ही अटक केली. तीन किलो सोने, 27 किलो चांदीसह सव्वादोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूरजवळ ही कारवाई करण्यात आली. चार आरोपींना अटक केली असून हे चारही आरोपी बिहारचे आहेत. त्रिपुरा ते चेन्नईच्या दिशेने जाणारी गाडी क्र. 12578 बागमती एक्स्प्रेसमध्ये चार युवक सोने-चांदीचे दागिने नेत होते. दरोडा टाकून मुद्देमालासह बिहारला पळून जाण्याच्या तयारीत असताना रेल्वे सुरक्षा बलाने गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. बल्लारशहा स्थानकावर गाडीची तपासणी करण्यात आली. दोन प्लास्टिक पिशव्यांमध्ये सोने-चांदीची दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू आढळल्या. या दागिन्यांची किंमत दोन कोटी दहा लाख आहे. विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली असल्याची माहिती स्थानिक आरपीएफ विभागाच्या वतीने सांगण्यात आली आहेत.



**तपासणीत सापडले काय**

रेल्वे सुरक्षा बलाने केलेल्या तपासणीत चोरट्यांकडून बॅग व गोणी जप्त करण्यात आली. नवीन व जुने कपडे, तीन काळ्या रंगाच्या पिशव्या व निळ्या रंगाची एक छोटी पिशवी, हिरव्या रंगाची मोठी पिशवी व निळ्या रंगाच्या गोणीमध्ये सापडले. यामध्ये सोने, चांदी आढळले. दोन्ही पिशव्यांमधील माल रिकामा करून गोणी, सोने, चांदी व पैसे वेगळे केले. त्या पिशवीत सापडलेले सोने, चांदी व पैसे प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून त्यांचे वजन केले. यामध्ये ३ किलो ३०६ ग्रॅम सोने सापडले. याची किंमत अंदाजे 1 कोटी 76 लाख 57 हजार रुपये आहे. 27 किलो 972 ग्रॅम चांदी सारपडली. याची अंदाजे किंमत 1 कोटी 95 लाख 8 हजार रुपये आहे. याशिवाय 14 लाख 52 हजार रुपये रोख सापडली.

**चार आरोपींना अटक करणारे कोण**

या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. बिहारमधील महताब आलम (वय 37) जहाँगीर खान (वय 20), अब्दुल वाहिब (वय 30), आरिफ (वय 20), अशी आरोपींची नावे आहेत. पंचनामानंतर मुद्देमाल जप्त करून आरोपींना अटक करण्यात आली आहेत.

ही कारवाई आरपीएफ निरीक्षक नवीन प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक प्रवीण महाजन, उपनिरीक्षक प्रवीण गाडवे, सहायक उपनिरीक्षक डी. गौतम, उपनिरीक्षक राम लखन, प्र. कॉन्स्टेबल रामवीर सिंग, प्र. कॉन्स्टेबल डी. एच. डबल, प्र. कॉन्स्टेबल जितेंदर पाटील, हवालदार पवनकुमार, हवालदार शिवाजी कन्नोजिया, हवालदार देशराज मीना, आर. मोहम्मद अन्सारी, आर. हरेंद्र कुमार, आर. रूपेश यांच्या वतीने करण्यात आली आहेत.

## साताऱ्यात एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन मुलीची हत्या, आरोपीचा आत्महत्येचा प्रयत्न

सातारा : एकतर्फी प्रेमातून एका अल्पवयीन मुलीवर चाकू हल्ला (Knife Attack) करुन युवकाने स्वतः विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या (Suicide) करण्याचा प्रयत्न केल्याची घटना साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यात घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मुलीला तात्काळ साताऱ्यातील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू (Death) झाला आहे. आरोपीनेही विषारी औषध प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती स्थिर आहे. या घटनेची नोंद वाठार पोलिस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे. निखिल राजे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



**एकतर्फी प्रेमातून मुलीवर हल्ला**

आरोपी निखिल आणि पीडिता एकाच गावातील रहिवासी आहेत. निखिल अनेक दिवसांपासून तरुणीवर प्रेम करत होता. मात्र तरुणीकडून त्याला कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. पीडितेचे सध्या शिक्षण सुरु असून रोज ती क्लासला जात असे. मुलगी आपल्या प्रेमाला प्रतिसाद देत नाही हे पाहून चिडलेल्या तरुणाने तिच्या येण्या-जाण्याच्या वेळेवर पाळत ठेवून आज सकाळी तिला गाठले. गावातील बस स्टँड परिसरात असलेल्या खाजगी क्लासबाहेर आरोपीने मुलीला गाठले आणि तिच्या पोटात चाकू भोसकला. या हल्ल्यात मुलगी गंभीर जखमी झाली. तिला तात्काळ तेथे उपस्थित स्थानिक नागरिकांनी उपचारासाठी साताऱ्यातील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मुलीवर हल्ला केल्यानंतर आरोपी तरुणाने विषारी औषध प्राशन केले. त्यानंतर तो स्वतःहून कोरेगाव पोलिस ठाण्यात हजर झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती आता स्थिर आहे. याप्रकरणी कोरेगाव पोलिस पुढील कारवाई करत आहेत.रत्नागिरीत पेपर कठिण गेला म्हणून बारावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या सध्या राज्यात बारावीची परीक्षा सुरु आहे. बारावीचा इंग्रजीचा पेपर कठिण गेल्याने नैराश्येतून एका विद्यार्थिनीने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना रत्नागिरीत घडली आहे. वैष्णवी श्रीनाथ असे मयत विद्यार्थिनीचे नाव असून ती सामाजिक उपक्रमातही सक्रिय होती. रत्नागिरीतील संकल्पनगरमध्ये वैष्णवी आपल्या आई-वडिलांसोबत राहत होती.

## ओढ्यातील पाण्यात बुडून मृत्यू तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू



पंढरपूर : ऊसतोडीच्या कामासाठी आलेला कामगारांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ऊसतोड कामगारांच्या तीन अल्पवयीन मुलांचा (Minor Children Death) दुर्दैवी मृत्यू झाला. ओढ्यातील पाण्यात बुडून तिघांचीही प्राणज्योत मालवली आहे. ही दुर्दैवी घटना सोलापूर जिल्ह्यातील (Solapur) मोहोळ तालुक्यातील आष्टी येथे घडली. सुरेखा हिरामण गायकवाड, रेणुका अंकुश जाधव, अजय बाळू जाधव (रा. शिंगणापूर जि.परभणी ) अशी मयत झालेल्या मुलांची नावे आहेत. ऊसतोड कामगार ऊसतोडीच्या कामासाठी गेले होते. यावेळी दोघी मुली आणि एक मुलगा असे तिघेही आष्टी येथील ओढ्यात कपडे धुण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना काल (शुक्रवारी) दुपारच्या सुमारास घडली. ऊसतोडीच्या कामासाठी आलेला कामगारांच्या तीन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कपडे धुण्यासाठी गेलेल्या मुलांचा ओढ्यातील पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## देवेंद्र फडणीविसांच्या सांगण्यावरून रश्मी शुक्लानी फोन टॅपिंग केल्याचा वकिलांचा आरोप



पुणे – 'तत्कालिन पोलिस आयुक्त रश्मी शुक्ला (IPS Rashmi Shukla) यांनी सरकारच्या इशाऱ्यावरून माझ्यासह अनेकांचे फोन टॅपिंग केले होते. यामागे न्या .लोया , ॲड. श्रीकांत खंडाळकर व निवृत्त न्यायाधिश ठोंबरे मृत्यूप्रकरणाची रहस्ये दडलेली आहेत ,त्यासाठी इस्त्रायली स्पायवेअर वापरण्यात आले. त्याचाच वापर राजकीय नेत्यांना ब्लॅकमेल (Blackmail) करून सरकार पाडण्यासाठी होत आहे ,असा आरोप ॲड .सतीश उके(Adv. Satish Uke) (नागपूर )यांनी आज पुण्यात पत्रकाद्वारे केला आहे.पुण्यात पत्रक प्रसिद्धीस दिल्यावर उके यांनी मुंबईत देखील आज पत्रकार परिषद घेऊन या आरोपांचा पुनरुच्चार केला . ॲड. सतीश उके , ॲड. रवी जाधव आणि ॲड. समीर शेख यांनी ही पत्रकार परिषद आयोजित केली होती .

**रश्मी शुक्ला यांनी बेकायदेशीर कृत्य केले**

इस्रायली पेगासिस स्पायवेअरच्या माध्यमातून माझ्या मोबाईलमधील डेटा चोरण्यात आला आहे. याचप्रमाणे लोया न्या. मृत्यूप्रकरणातसुद्धा इस्रायली स्पायवेयरद्वारे महत्वाची माहिती इतरांच्या मोबाईलमधून चोरून त्यातील पुरावे मिटविण्यात आले. त्यात ॲड. श्रीकांत खंडाळकर व निवृत्त न्यायाधिश ठोंबरे मृत्यूप्रकरण घडविण्यात आले. ॲड. श्रीकांतमधील खून प्रकरणात त्यांचा मोबाईल आजपर्यंत पोलिसांना सापडलेला नाही.

ॲड. सतीश उके यांचे मोबाईल मध्ये सेव्ह असलेला त्यांचा दुसरा खाजगी मोबाईल क्रमांकदेखील इस्रायली पेगासिस वापरून चोरण्यात आला. याप्रकरणी अजनी पोलिसांना अति. मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी दि 30 डिसेंबर 2020रोजीचे आदेशाने तपास करण्याची परवानगी दिली आहे. त्याची चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही ॲड. सतीश उके यांनी केली आहे.

## बोरिवली येथून हरवलेली मुलगी इगतपुरी रेल्वे स्थानकात सापडली, पोलिसांनी पालकांकडे केले सुपूर्द

नाशिक / शैलेश पुरोहित (इगतपुरी प्रतिनिधी) : मुंबईतील बोरिवली येथील चुकलेली 12 वर्षाची मुलगी इगतपुरी रेल्वे स्टेशन (Igatpuri Railway Station)वर पोहचली. त्यानंतर इगतपुरी रेल्वे पोलिसांनी या मुलीला ताब्यात घेत तिची विचारपूस केली. यानंतर बोरिवली येथून चुकलेल्या 12 वर्षीय मुलीला तिच्या पालकां (Parents)च्या स्वाधीन करण्यात आले आहे. इगतपुरी रेल्वे पोलिसांच्या सतर्कतेने मुलीला पालकांच्या ताब्यात दिल्याने पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी दीपक काजवे, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. बी. भाईक, पोलीस उपनिरीक्षक मुरारी गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

**आपण चुकून इगतपुरी रेल्वे स्थानकात आल्याचे मुलीने सांगितले**

इगतपुरी येथे कर्तव्यावर हजर असलेले पोलीस हवालदार साळेकर, गवारगुरु, पाटील यांना 12 वर्षाची एक मुलगी रेल्वे स्टेशन इगतपुरी येथे प्लॅटफॉर्म क्र. 2 वर एकटी विनापालक दिसून आली. त्यावरून तिला इथे येण्याचे कारण



विचारले असता तिने समाधानकारक सांगितले नाही. त्यामुळे तिला तिची काळजी व संरक्षणासाठी रेल्वे पोलीस ठाणे इगतपुरी येथे नेण्यात आले. पोलिस ठाण्यात आणून तिची विचारणा केली असता तिने आपले नाव पोलिसांना सांगून ती मुंबईतील बोरिवली येथील रहिवासी असल्याची माहिती दिली. रेल्वेमधून चुकून इगतपुरी रेल्वे स्टेशन येथे आल्याचे तिने सांगितले. त्यानुसार रेल्वे पोलिस ठाणे इगतपुरी येथील स्टेशन ड्यूटीवर हजर असलेले कर्मचारी यांनी वेळेवर कार्यतत्परता दाखवून तिला पोलिस ठाण्यात आणून पोलिस ठाणे अंमलदार पोलिस हवालदार भालेराव यांनी तिची काळजी संरक्षणासाठी पोलिसाची नेमणूक केली. तिच्या पालकांशी संपर्क साधून तिला त्यांच्या स्वाधीन केले. रेल्वे पोलीस ठाणे बोरीवली येथील महिला पोलिस कॉन्स्टेबल सुषमा जाधव व बालिकेचे वडील किरण जगताप यांच्या ताब्यात दिले. पोलिस हवालदार साळेकर, पोलिस हवालदार गवारगुरु, पोलिस हवालदार भालेराव, पोलिस कॉन्स्टेबल पाटील, मपोकॉ मारबदे, पोलिस कॉन्स्टेबल निचत यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

**नांदेडमध्ये रस्त्यावरील बालकांचे सर्वेक्षण होणार**

नांदेड जिल्ह्यात रस्त्यावर राहणारे अनाथ, बेघर, दिवसभर रस्त्यावर राहून रात्री जवळच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या आणि कुटुंबासमवेत रस्त्यावर जी बालके राहतात त्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी संबंधित विभागाला असे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा प्रशासनाच्या महिला व बाल विकास विभागातर्फे याचे नियोजन करण्यात आले आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनेद्वारे या मुलांचे पुनर्वसन करण्यासाठी हे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, या सर्व बालकांची राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या (एनसीपीसीआर) या संकेस्थळावर नोंदणी केली जात आहे.

## राज्यातील आमदार-खासदारांविरुद्ध पाचशे खटले प्रलंबित



मुंबईः महाराष्ट्रातील आजी-माजी आमदार व खासदारांच्या विरोधात कनिष्ठ न्यायालयांमध्ये जवळपास पाचशे खटले प्रलंबित आहेत आणि खटल्यांशी संबंधित ५१ न्यायालयीन प्रकरणे मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत, अशी माहिती 'सुओ मोटो' जनहित याचिकेच्या निमित्ताने समोर आली आहे.

'आजी-माजी आमदार-खासदारांविरुद्धच्या फौजदारी खटल्यांची जलदगतीने सुनावणी व्हायला हवी आणि अशा खटल्यांत दोषी ठरलेल्या राजकीय नेत्यांना निवडणूक लढवण्यावर कायमची बंदी घालायला हवी,' अशा विनंतीची जनहित याचिका भाजप नेते व वकील अश्विनीकुमार उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात केली होती.

त्याविषयीच्या सुनावणीनंतर सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय पीठाने अशा प्रकरणांसाठी विशेष न्यायालयांची स्थापना करण्याचे निर्देश राज्य सरकारांना दिले होते. उच्च न्यायालयाच्या परवानगीविना अशा लोकप्रतिनिधींविरोधातील खटले मागे घेता येणार नाहीत, असेही आदेशात म्हटले होते.

## ठाण्यात सोनसाखळी चोरीच्या गंभीर गुन्ह्यातील 2 आरोपींना अटक, चार गुन्हे उघड

ठाणे : ठाण्यातील कळवा परिसरात सोनसाखळी चोरणाऱ्या 2 तरुणांना कळवा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गेले काही दिवस कळवा परिसरात सोनसाखळी चोरीचे प्रमाण वाढत आहे. कळवा पोलिस ठाण्या त नोंदवण्यात आलेल्या तक्रारीवरून पोलिस स्टेशन हद्दीत पोलिसांनी गस्त वाढवून दोन आरोपीं ना कळवा पूर्व मफतलाल परिसर येथून ताब्यात घेऊन या गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. घटनास्थळी कोणतेही पुरावे नसताना पोलिसांनी या आरोपींना शोधून बेड्या ठोकल्या आहेत. या आरोपींकडून 2 लाख रुपयाचा मुद्देमाल आणि एक दुचाकी ताब्यात घेण्यात आली आहे. या आरोपींना ठाणे न्यायालयाने 9 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यामागे मोठी टोळी असल्याचा संशय देखील कळवा पोलिसांनी व्यक्त केला आहे. महिलांनी घराबाहेर पडताना महागडे दागिने घालू नये व रस्त्यावर चालताना आपल्या दागिन्यांची काळजी घेण्याचे आवाहन यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त व्यंकट आंधळे यांनी केले आहे. उल्हासनगरात दुचाकी चोरीची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898